**L. A. Bill No. VI OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१५ चा महा. २८. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,

२०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता; २०२६ चा महा. अध्या २.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम १ मधील पोट-कलम (१) मधील, "महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन)" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०१५ चा महा. २८.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-१) "अनुदानित संस्था" याचा अर्थ, ज्या खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेला केंद्र सरकारकडून, राज्य शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी सहाय्य किंवा सहायक अनुदान मिळत आहे, अशी संस्था, असा आहे;";

(२) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ख-१) "अपील प्राधिकरण" याचा अर्थ, कलम १५क अन्वये घटित केलेले अपील प्राधिकरण, असा आहे;";

(३) खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ग-१) "सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष" याचा अर्थ, कलम १० मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, असा आहे;";

(४) खंड (छ) ऐवजी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(छ) "शुल्क" याचा अर्थ, कलम १५ मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन, शुल्क नियामक प्राधिकरणाने शुल्क म्हणून निर्धारित केलेली रक्कम, असा आहे ; परंतु त्यामध्ये वसतिगृह-निवासव्यवस्था, परिवहन, भोजनालय आकार आणि विद्यार्थी विमा शुल्क, इत्यादींसारख्या वैकल्पिक सुविधांच्या वापरासाठी देय असलेल्या कोणत्याही आकारांचा समावेश होत नाही ;";

(५) खंड (ट) मध्ये, "पाठ्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षाच्या" या मजकुराऐवजी, "पाठ्यक्रमाच्या दुसऱ्या किंवा लगतनंतरच्या कोणत्याही वर्षाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(६) खंड (ढ) नंतर, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ढ-१) "भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय)" याचा अर्थ, नागरिकत्व अधिनियम, १९५५ याच्या कलम ७क मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल;"; १९५५ चा ५७.

(७) खंड (थ) मधील, उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

२०२१ चा महा. ७. २०२४ चा महा. ३५.

"(चार) महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ अन्वये विधिसंस्थापित झालेले रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापीठ; किंवा महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ याच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठ किंवा त्या विद्यापीठांशी संलग्न असलेले कोणतेही महाविद्यालय किंवा संस्था;";

(८) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल, :—

"(फ-१) "निवड समिती" याचा अर्थ, कलम २०क अन्वये घटित केलेली समिती, असा आहे;";

(९) खंड (ब) मध्ये, "संबंधित संस्थेमध्ये शिकणारे विद्यार्थी" या मजकुराऐवजी, "संस्थेमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी किंवा संबंधित संस्थेमध्ये शिकणारे विद्यार्थी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(१०) खंड (भ) मध्ये, "सहायक अनुदान" या मजकुराऐवजी, "त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी सहायक अनुदान" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

२०२४ चा महा. १६.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) मधील, "अधिनियम, २००६" या मजकुरानंतर, ", महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये कलम ६क समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

शासकीय संस्था, इत्यादींमधील प्रवेशाची पद्धत.

"**६क.** प्रवेशाच्या विनियमनाच्या बाबतीत कलमे ३, ४, ५ व ६ च्या आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या बाबतीत कलम १० च्या तरतुदी, शासकीय संस्था, शासकीय अनुदानित संस्था आणि सार्वजनिक विद्यापीठ विभाग किंवा संस्था यांना, योग्य त्या फेरफारांसह, लागू असतील.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या प्रकरण तीनच्या शीर्षकाची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण तीन मध्ये, शीर्षकातील "आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये,—

(१) पोट-कलम (३) मधील,—

(एक) खंड (क) मध्ये, "मुख्य सचिव किंवा अपर मुख्य सचिव दर्जाचा" या मजकुराऐवजी, "प्रधान सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जाचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (ख) मध्ये, "विद्यापीठाचा कुलगुरू" या मजकुराऐवजी, "सार्वजनिक विद्यापीठाचा कुलगुरू किंवा प्र-कुलगुरू" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ख-१) विधि व न्याय विभागाच्या विधि शाखेत काम केले आहे ...... सदस्य";
असा सह सचिव या दर्जापेक्षा कमी नसेल असा एक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी

(चार) खंड (ङ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(ङ-१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन ...... सदस्य

(ङ-२) संचालक, आयुष (AYUSH) ..... सदस्य

(ङ-३) संचालक, कला ..... सदस्य";

(२) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) "(ख)" या मजकुराऐवजी, "(ख), (ख-१)" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) "राज्य शासनाकडून" या मजकुरानंतर, "निवड समितीच्या शिफारशीवरून विहित रीतीने" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलमे (१) व (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(१) अध्यक्षाचा व सदस्याचा पदावधी, त्यांनी त्यांचे पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा किंवा तो वयाची सत्तर वर्षे पूर्ण करेपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तो असेलः

परंतु, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६ च्या प्रारंभाच्या दिनांकास जी प्रत्येक व्यक्ती, अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करीत आहे ती, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून आणि त्यानंतर, अध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून ते ज्या अटी व शर्तींवर नियुक्त झाले होते, त्या अटी व शर्तींवर त्यांचा पदावधी पूर्ण होईपर्यंत पद धारण करणे चालू ठेवतील. २०२६ चा महा.......

(२) अध्यक्ष व सदस्य हे, केवळ आणखी एकदाच सलग तीन वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्नियुक्तीकरिता पात्र असतील.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ९ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मधील,—

(१) पोट-कलम (१) मध्ये,-

(एक) खंड (एक) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(एक) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, नियम करण्यास शासनाला सहाय्य करणे;";

(दोन) खंड (तीन) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल,—

"(तीन-क) प्राधिकरणाच्या सदस्य-सचिवाद्वारे तयार केलेला अर्थसंकल्पीय अंदाज सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजासह मिळविणे व ते त्याच्या मान्यतेसाठी शासनास सादर करणे;

(तीन-ख) विहित केलेल्या रीतीने लेखे ठेवणे आणि त्यांचे भारताचे सनदी लेखापाल संस्थेचा सदस्य असलेल्या सनदी लेखापालाद्वारे लेखापरीक्षण करून घेणे;

(तीन-ग) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत (सीएपी) विद्यार्थ्यांना सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्रे (एफसी) आणि विद्यार्थी सहाय्यता केंद्रे (एसएसी) स्थापन करणे व त्यांना मान्यता देणे;

(तीन-घ) इतर कोणतीही आनुषंगिक कार्ये पार पाडणे;";

(तीन) खंड (चार) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(चार) प्रवेशांशी संबंधित तक्रार निवारण यंत्रणेच्या तरतुदींद्वारे हितसंबंधित घटकांच्या तक्रारींचे निवारण करणे;

(पाच) हितसंबंधित घटकांशी प्रवेशांशी संबंधित पद्धतशीर संदेशवहणाची सुनिश्चिती करणे;";

(२) पोट-कलम (३) वगळण्यात येईल;

(३) पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील:—

"(५) (क) या अधिनियमाखालील आपली कार्ये व कर्तव्ये पार पाडताना प्राधिकरण व संचालनालये तसेच प्रत्येक विनाअनुदानित संस्था पुढील कार्यपद्धती अनुसरील :—

(एक) प्रत्येक विनाअनुदानित संस्था, प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत संबंधित संचालनालयाला 'प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव' इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर करील.

(दोन) संबंधित संचालनालय, प्रवेश मान्यता प्रस्तावाची त्यात कोणतीही विसंगती, असल्यास, त्यासह छाननी करील व प्रमाणित करील आणि अशा संस्थेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पन्नास दिवसांच्या आत, आपली शिफारस, प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवील. संचालनालयाच्या शिफारशीची एक प्रत संबंधित संस्थेला इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठविण्यात येईल.

(तीन) संचालनालयाकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व प्रवेश मंजुरी प्रस्तावांची प्रवेश नियामक प्राधिकरण छाननी करेल व अशा प्रत्येक प्रस्तावावर प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या ३१ जानेवारी पूर्वी निर्णय घेण्यात येईल :

परंतु, प्रवेश नियामक प्राधिकरणास, समुचित प्राधिकरणाने, वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे व्यावसायिक शिक्षणाच्या विशिष्ट पाठ्यक्रमाला प्रवेश घेण्याकरिता असलेला अंतिम दिनांक विचारात घेऊन, प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या ३१ जानेवारीनंतर तीन महिन्यांपर्यंत एकाचवेळी, आपल्या निर्णयाचा दिनांक त्याची कारणे नमूद करून वाढविता येईल, परंतु तो संबंधित व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या शैक्षणिक वर्ष समाप्तीच्या पलीकडे कोणत्याही परिस्थितीत, वाढविता येणार नाही.

(चार) प्रवेश नियामक प्राधिकरण लवकरात लवकर संबंधित संस्थेला व विद्यापीठाला त्याची मान्यता कळवील.

(पाच) हितसंबंधित घटकाने केलेली कोणतीही तक्रार, प्रवेश नियामक प्राधिकरणासमोर दाखल करता येईल आणि प्राधिकरण, लवकरात लवकर, व कोणत्याही परिस्थितीत शैक्षणिक वर्ष समाप्तीच्या आत त्यावर निर्णय घेईल.

(सहा) प्रवेश नियामक प्राधिकरणास, एकतर स्वतःहून किंवा हितसंबंधित घटकाच्या अर्जावरून, त्यासाठीची कारणे नोंदविल्यावर, स्वतःच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार असेल; परंतु दुसऱ्यांदा पुनर्विलोकन करणे अनुज्ञेय असणार नाही.

(सात) कोणत्याही विशिष्ट व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या बाबतीत प्रवेश मान्यता प्रस्ताव इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करणे शक्य नसल्यास, असा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने प्रत्यक्ष सादर करता येईल.

(आठ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या आदेशाने किंवा निर्णयाने व्यथित झालेल्या हितसंबंधित घटकास, प्रवेश नियामक प्राधिकरणाचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अपील प्राधिकरणाकडे आपले अपील दाखल करता

येईल. अपील प्राधिकरण, असे अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत निकालात काढील व अपील प्राधिकरणाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(ख) प्रवेश नियामक प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ त्यामध्ये कोणतीही जागा रिक्त आहे किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष आहे, या कारणास्तव अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही.

(ग) प्रवेश नियामक प्राधिकरण, प्रवेश प्रस्तावांच्या छाननीबाबतची आपली कार्यपद्धती व त्यास योग्य वाटेल अशी तक्रार निवारण यंत्रणा विनियमांद्वारे, विहित करील.

(घ) सदस्य-सचिव हे प्राधिकरणाच्या कार्यालयाचे प्रशासकीय प्रमुख असतील व विनियमांद्वारे त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करतील.

(६) प्रवेश नियामक प्राधिकरणास, प्रवेशांच्या बाबतीत पडताळणी करण्यासाठी व प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी अधिकारी व तज्ज्ञांच्या चौकशी समित्या घटित करता येतील.

(७) पोट-कलम (६) अन्वये चौकशी समित्यांची संख्या व अशा सदस्यांना देय असणारे बैठकीचे व इतर भत्ते, प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

(८) अध्यक्षास :—

(एक) जेव्हा त्या विद्यापीठाशी संबंधित व्यावसायिक पाठ्यक्रमांच्याबाबतीत प्रवेश नियामक प्राधिकरणाचे कामकाज सुरू असेल तेव्हा, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही सार्वजनिक विद्यापीठाच्या कुलसचिवाला निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करता येईल;

(दोन) उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, वास्तुशास्त्र, कृषी, आयुर्वेद औषधशास्त्र, समचिकित्सा, दंतशास्त्र, परिचर्या किंवा औषधनिर्माणशास्त्र शिक्षण या क्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीस किंवा अधिकाऱ्यास त्यांचे तज्ज्ञ मत घेण्यासाठी आमंत्रित करता येईल. अशा तज्ज्ञ निमंत्रित व्यक्ती, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकींच्या कामकाजात सहभागी होऊ शकतील, परंतु, त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याचे कलम १० ऐवजी दाखल करणे.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० ऐवजी, पुढील प्रकरण दाखल करण्यात येईल :—

## "प्रकरण ३-क

## महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष.

**१०.** (१) या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी " महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष" असेल. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, हा उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल, त्यास अखंड परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि त्यास जंगम व स्थावर अशा दोन्हीही प्रकारच्या मालमत्ता संपादित करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट लावण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या विरुद्ध किंवा त्याच्या नावाने दावा दाखल करता येईल.

(२) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल,-

(क) शासनाद्वारे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे आयुक्त म्हणून नियुक्त केलेला, सह सचिव या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी ..... अध्यक्ष

(ख) वैद्यकीय, तंत्रज्ञान, कृषी, उच्च शिक्षण, कला व आयुष या क्षेत्रांतील राज्य शासनाच्या उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले, सहा. अधिकारी ..... सदस्य.

(३) अध्यक्षाची नियुक्ती ही राज्य शासनाकडून करण्यात येईल आणि पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये सदस्यांची नियुक्ती अनुक्रमे वैद्यकीय, तंत्रज्ञान, कृषी, उच्च शिक्षण, कला व आयुष संचालक यांच्याकडून करण्यात येईल.

(४) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अध्यक्ष किंवा सदस्य, राज्य शासन किंवा संचालक यांच्या मते, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून अशोभनीय ठरेल असे कोणतेही कृत्य केल्यास, ते राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे अध्यक्ष किंवा सदस्य असण्याचे बंद होईल.

(५) अध्यक्ष, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषवील आणि विनियमांद्वारे त्यास योग्य वाटेल अशा स्वतःच्या कार्यपद्धतीचा अवलंब करता येईल.

**१०क.** (१) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील,— राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे अधिकार व कार्ये.

(क) विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशांसाठीची सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कार्यक्षम, पारदर्शक, सुरळीत आणि योग्य रीतीने आयोजित करणे व त्याचे संनियंत्रण करणेः

परंतु, राज्य शासनास, केंद्र सरकारच्या प्राधिकरणाद्वारे घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत (सीईटी) प्रवेश देण्यास मान्यता देता येईल;

(ख) सामाईक प्रवेश परीक्षेचे (सीईटी) प्रश्नसंच तयार करण्यासाठी आणि त्यांच्या गोपनीय प्रचालनासाठी विषयतज्ज्ञ निश्चित करणे आणि त्यांना नामिकाप्रविष्ट करणे;

(ग) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आवश्यक ती गोपनीयता राखून, योग्य रीतीने आयोजित करण्याच्या संबंधात सर्व निर्णय घेणे. तो कक्ष, परीक्षक, मूल्यमापक, नियामक यांची नियुक्ती करील आणि परीक्षांचे आयोजन, मूल्यमापन व निकालाची प्रक्रिया यांसाठी आवश्यक सॉफ्टवेअर विकसित करण्याच्या कामगिरीसाठी व्यक्तींची नियुक्ती करील आणि तसेच ऑनलाईन किंवा ऑफलाईन परीक्षा आयोजित करण्यासाठी आवश्यक त्या सेवा पुरवठादारांची नियुक्ती करील आणि विविध दस्तऐवज, इत्यादींची छपाई करील. सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याशी संबंधित सर्व कामकाजाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्तीय अधिकारांचा वापर करील;

(घ) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) ही अनुकूलनक्षम, जबाबदार, विश्वसनीय, दोषरहित, विद्यार्थीहितैषी, सुरक्षित, छेडछाडरहित, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने आयोजित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे;

(ङ) परीक्षा गट आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण व मार्गदर्शक सूचना देणे;

(च) परीक्षा-पूर्व टप्प्यात तसेच सामाईक प्रवेश परीक्षे (सीईटी) दरम्यान विद्यार्थ्यांना साहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्रे (एफसी) व विद्यार्थी साहाय्यता केंद्रे (एसएसी) स्थापन करणे व त्यांना मान्यता देणे;

(छ) राज्यातील विविध ठिकाणी ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यासाठी राज्यात अध्ययन व चाचणी केंद्रे स्थापन करणे;

(ज) सामायिक प्रवेश परीक्षेशी (सीईटी) संबंधित तक्रार निवारण यंत्रणेची तरतूद करणे;

(झ) प्रत्येक वर्षी २८ फेब्रुवारीपूर्वी पुढील वर्षासाठीचे उत्पन्न व खर्च यांचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे;

(ञ) खंड (झ) मध्ये निर्दिष्ट केल्या प्रमाणे तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज विचारात घेणे व ते त्या दिनांकास किंवा दिनांकानंतर शासनाच्या मंजुरीसाठी सादर करणे ;

(ट) आवश्यकतेनुसार अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सुधारणा करणे व ते शासनाच्या मंजुरीसाठी सादर करणे;

(ठ) विहित केलेल्या नमुन्यात व रीतीने लेखे ठेवणे;

(ड) भारतीय सनदी लेखापाल संस्थेचा सदस्य असलेल्या लेखापरीक्षकाकडून लेख्यांचे लेखापरीक्षण करणे;

(ढ) प्रवेश नियामक प्राधिकरणास किंवा शासनास आवश्यक असतील असे अहवाल, विवरणपत्रे आणि निवेदने सादर करणे;

(ण) या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या व विनिमयांच्या तरतुदींचे आणि राज्य शासनाच्या निदेशांचे काटेकोरपणे पालन होईल याची सुनिश्चिती करणे.

(२) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या आयुक्तास, आणीबाणीच्या प्रसंगी, त्यांना योग्य वाटेल अशी किंवा आवश्यक असेल अशी कार्यवाही करता येईल किंवा निर्णय घेता येईल.

(३) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या आयुक्तास, त्यांच्या मते, अशा बैठकीत चर्चा किंवा विचारविमर्श करण्यासाठी एखाद्या तज्ज्ञाला आमंत्रित करणे शक्य वाटत असल्यास, त्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी एखाद्या विषयतज्ज्ञास आमंत्रित करता येईल.

(४) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षास त्याचे कार्य कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा समित्या घटित करता येतील. सदस्यांची संख्या, त्यांची कर्तव्ये व कार्ये आणि बैठकींना उपस्थित राहण्यासाठी सदस्यांना देय असलेले भत्ते विनियमांद्वारे विहित करता येतील.

(५) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, शासनाने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पाच्या अधीन राहून, सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्याशी संबंधित सर्व कार्ये पार पाडण्यासाठी वित्तीय अधिकारांचा वापर करील.

(६) सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षास विहित करण्यात येतील असे अन्य अधिकार असतील आणि तो विहित करण्यात येतील अशी अन्य कार्ये पार पाडील आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने परीक्षांचे आयोजन करील.

(७) प्रत्येक जागेवरील प्रवेश हा, सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये (सीईटी) संपादित केलेल्या गुणवत्तेच्या आधारावर राज्याचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे राज्याच्या आरक्षण धोरणाच्या अधीन राहून केला जाईलः

परंतु, संस्थात्मक कोट्यातील प्रवेश हा कलम ४ च्या खंड (क) मधील पहिल्या परंतुकामध्ये तरतूद केलेल्या रीतीने देण्यात येईल.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**११.** (१) मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,—

(१) पोट-कलम (३) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) जिल्हा न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला सेवानिवृत्त अधिकारी ..... अध्यक्ष";

(२) पोट-कलम (४) मध्ये, "शासनाकडून" या मजकुरानंतर, "निवड समितीच्या शिफारशीनुसार विहित रीतीने" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(३) पोट-कलम (७) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट केले जाईलः—

"(७-क) सदस्य-सचिव हा प्राधिकरणाच्या कार्यालयाचा प्रशासकीय प्रमुख असेल आणि तो विनियमांद्वारे त्यांच्याकडे सोपवण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील.".

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,— सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १३ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मधील, खंड (पाच) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :—

"(सहा) शुल्क प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रमाणके वेळोवेळी निर्धारित करणे;

(सात) शुल्काशी संबंधित केलेल्या कोणत्याही निर्देशांबाबत, कोणतेही केले असल्यास त्याबाबत शासनास सल्ला देणे;";

(२) पोट-कलम (२) मधील, खंड (दोन) व (तीन) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(दोन) विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेद्वारे विद्यार्थ्यांना पुरवण्यात आलेल्या पायाभूत सोयी व सुविधा यांच्या पडताळणीसाठी यंत्रणा विकसित करणे ;

(तीन) शुल्क व शुल्क प्रस्तावांशी संबंधित तक्रारींच्या निवारणासाठी उपाययोजना करणे;

(चार) शुल्क वसुलीमध्ये कोणतीही नफेखोरी नाही, याची खात्री करणे, पडताळणी करणे आणि ते सुनिश्चित करणे ;";

(३) पोट-कलम (३) वगळण्यात येईल ;

(४) पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(५) शुल्क नियामक प्राधिकरणास, संस्थांनी विद्यार्थ्यांकडून वसूल केलेल्या शुल्काच्या बदल्यात त्यांना पुरविलेल्या पायाभूत सुविधा आणि सुखसोयींची पडताळणी करण्यासाठी आणि त्याबाबत प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी अधिकारी व तज्ज्ञांच्या निरीक्षण समित्या घटित करता येतील.

(६) पोट-कलम (५) अन्वये निरीक्षण समितीच्या सदस्यांची संख्या आणि अशा सदस्यांना देय असलेले बैठक व इतर भत्ते प्राधिकरण वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील.

(७) शुल्क नियामक प्राधिकरणास, कोणत्याही विनाअनुदानित संस्थेचे आणि तिच्या इमारती, वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये, उपकरणे यांसारख्या पायाभूत सुविधांचे तसेच अशा कोणत्याही संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या अध्यापन व इतर कामांचे, ते निदेशित करील अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून निरीक्षण किंवा चौकशी करवून घेण्याचा अधिकार असेल.

(८) प्राधिकरण, प्रत्येक प्रकरणात, निरीक्षण किंवा चौकशी करवून घेण्याच्या आपल्या हेतूची यथोचित नोटीस संस्थेला देईल आणि संस्थेला तिचा प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार असेल, त्याला अशा निरीक्षण किंवा चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्याचा आणि आपली बाजू मांडण्याचा अधिकार असेल.".

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १४ ऐवजी दाखल करणे.

शुल्क नियामक प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

"**१४.** (१) शुल्क संरचनेचा वाजवीपणा निर्धारित करताना, पुढील तरतुदी लागू असतील :—

(क) प्राधिकरण दरवर्षी विनाअनुदानित संस्थांच्या व्यवस्थापनाकडून शुल्क प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रमाणके निर्धारित करील आणि ते अगोदरच त्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करील;

(ख) विनाअनुदानित संस्थेचे व्यवस्थापन, शुल्क नियामक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात, लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षित लेख्यांच्या प्रमाणित प्रती, आणि संबद्ध अभिलेख व पुरावे यांसह शुल्क प्रस्ताव शुल्क नियामक प्राधिकरणाकडे, मागील शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑक्टोबरच्या आत, त्याच्या मान्यतेसाठी सादर करील. सदर प्रस्ताव खंड (क) अन्वये निर्धारित केलेल्या प्रमाणकांशी अनुरूप असेल :

परंतु, प्राधिकरणास, पुरेसे कारण दाखविल्यावर, आणि खर्च प्रदान करण्याच्या अधीन राहून मागील शैक्षणिक वर्षाच्या ३१ डिसेंबर पर्यंत शुल्क प्रस्ताव स्वीकारता येतील;

(ग) प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत शुल्क नियामक प्राधिकरणाकडे शुल्काच्या सुधारणेसाठीचा प्रस्ताव सादर केला नसेल तर त्याबाबतीत, प्राधिकरणाने मान्यता दिलेली आणि मागील शैक्षणिक वर्षामध्ये लागू असलेली शुल्क संरचना फक्त पुढील शैक्षणिक वर्षाच्या कालावधीकरिता लागू राहील;

(घ) सलग दोन किंवा अधिक शैक्षणिक वर्षांसाठी शुल्काचा प्रस्ताव सादर केला नसेल तर त्याबाबतीत, शुल्क नियामक प्राधिकरणाने लगतपूर्वी मान्यता दिलेले शुल्क, प्राधिकरणाद्वारे वीस टक्क्यांनी कमी करण्यात येईल;

(ङ) शुल्क नियामक प्राधिकरण, सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता छाननी कक्ष स्थापन करील आणि वेगवेगळ्या पाठ्यक्रमांसाठी वेगवेगळे छाननी कक्ष स्थापन करता येतील.

(च) छाननी कक्षाचा अहवाल आणि इतर सर्व संबंधित घटक विचारात घेतल्यानंतर, शुल्क नियामक प्राधिकरण, प्रस्तावित शुल्काचा तपशील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या कालावधीच्या आत शुल्क प्रस्तावाला मान्यता देईल आणि तसा निर्णय संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाला कळवील;

(छ) जर शुल्क नियामक प्राधिकरणाचा शुल्क प्रस्तावावरील निर्णय विनाअनुदानित संस्थेच्या व्यवस्थापनाला स्वीकार्य नसेल तर, त्या संस्थेस, निर्णय कळविल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत शुल्क नियामक प्राधिकरणाकडे त्याच्या निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी सविस्तर कारणांसह पुनर्विलोकन अर्ज सादर करता येईल. शुल्क नियामक प्राधिकरण मागील शैक्षणिक वर्षाच्या ३१ मार्चपूर्वी अशा पुनर्विलोकन अर्जावर निर्णय देईल आणि त्यानुसार संबंधित व्यवस्थापनाला त्याचा निर्णय कळवील;

(ज) शुल्क नियामक प्राधिकरणास, त्यास योग्य वाटेल अशी, शुल्क प्रस्तावांची छाननी आणि तक्रार निवारण यंत्रणेसंबंधीची त्याची कार्यपद्धती विहित करता येईल.

(२) शुल्क नियामक प्राधिकरणाच्या प्रलंबित निर्णयाच्या अधीन राहून, संस्थेस, प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीने, अंतिम किंवा यथास्थिति तात्पुरते शुल्क प्रस्तावाचे अंतिम निर्धारण करण्यात येईपर्यंत, गोळा करता येईल.

(३) जर एखाद्या संस्थेला शुल्क नियामक प्राधिकरणाने मागील शैक्षणिक वर्षासाठी विहित केलेले शुल्क चालू शैक्षणिक वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही बदलाशिवाय लागू

करावयाचे असेल तर, त्या संस्थेला शुल्क नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेने तसे करता येईल; मात्र संस्थेने तसा प्रस्ताव शुल्क नियामक प्राधिकरणाला, वेळेवर सादर करणे आवश्यक आहे.

(४) शुल्क नियामक प्राधिकरण, ज्या शीर्षांखाली शुल्क आकारले जाईल आणि वसूल केले जाईल, अशी वेगवेगळी शीर्षे निर्देशित करील.

(५) (क) प्रत्येक विनाअनुदानित संस्था, शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्यता दिल्याप्रमाणे पाठ्यक्रम-निहाय शुल्क आणि शीर्ष-निहाय शुल्क (अंतिम किंवा, यथास्थिति, तात्पुरत्या शुल्कासह) त्याच्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्ये प्रदर्शित करील;

(ख) भाषिक अल्पसंख्याक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्याक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्याक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील;

(ग) अशा प्रकारे प्रदर्शित केलेले शुल्क, विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल.

(६) (क) कोणतीही संस्था एखाद्या विद्यार्थ्याकडून एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्काच्या रकमेपेक्षा अधिक शुल्क वसूल करणार नाही;

(ख) एखाद्या शैक्षणिक वर्षात एका वर्षापेक्षा अधिक शुल्क वसूल करणे याचा, कॅपिटेशन फी असल्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल आणि अशी संस्था महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ व या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास पात्र असेल;

१९८८ चा महा. ६.

(ग) जर कोणतीही तक्रार प्राप्त झाली असेल किंवा अन्यथा, तिच्या चौकशीनंतर जर प्राधिकरणाचे असे मत झाले की, कोणत्याही संस्थेने प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारले आहे, तर अशी संस्था अशा विद्यार्थ्यास असे अधिक शुल्क परत करण्यास पात्र असेल आणि या अधिनियमात तरतूद केलेल्या शास्तीस देखील पात्र असेलः

परंतु, जर तक्रारदार हा, पुनःपरीक्षार्थी किंवा संस्थेचा माजी विद्यार्थी असेल तर, संस्था सोडल्यापासून एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर केलेली, अशी कोणतीही तक्रार प्राधिकरणाकडून दाखल करून घेतली जाणार नाही.

(७) कोणतीही संस्था, विद्यार्थ्याला त्याचे पुढील शिक्षण सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेले गुणपत्रक, हस्तांतरण प्रमाणपत्र किंवा इतर कोणतेही कागदपत्रे, त्याला लेखी कारणे कळविल्याशिवाय अडवून ठेवणार नाही.

(८) शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले व कळविलेले शुल्क, त्या शैक्षणिक वर्षात त्या विनाअनुदानित संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत लागू असेल आणि त्यात संबंधित संस्थेतील अशा विद्यार्थ्यांचा पाठ्यक्रम पूर्ण होईपर्यंत त्यात सुधारणा करण्यात येणार नाहीः

परंतु, विनाअनुदानित संस्थेस, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने, करांमधील सुधारणा, नियमित खर्चामध्ये अचानक झालेला फेरबदल, इत्यादी कारणास्तव, दुसऱ्या किंवा नंतरच्या वर्षांच्या शुल्कामध्ये सुधारणा करता येईल.".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये प्रकरण चार–क समाविष्ट करणे.

" प्रकरण चार-क

## अपील प्राधिकरण

अपील प्राधिकरण.

**१५-क.** (१) प्रवेश नियामक प्राधिकरण व शुल्क नियामक प्राधिकरण यांनी दिलेल्या आदेशांमधून किंवा निर्णयांमधून उद्‌भवणाऱ्या अपिलांवर निर्णय देण्यासाठी आणि या अधिनियमांन्वये नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी एक अपील प्राधिकरण असेल.

(२) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एक अपील प्राधिकरण घटित करता येईल. उक्त प्राधिकरण हे, उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल, त्यास अखंड परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल.

(३) अपील प्राधिकरण पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल,-

| | | |
|---|---|---|
| (क) उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा अपर मुख्य सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला शासनाचा सेवानिवृत्त अधिकारी. | .... | अध्यक्ष |
| (ख) दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेचा सदस्य असेल असा नामांकित सनदी लेखापाल | .... | सदस्य |
| (ग) दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय व्यय आणि परिव्यय संस्थेचा सदस्य असेल, असा नामांकित परिव्यय लेखापाल | .... | सदस्य |
| (घ) व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ; | .... | सदस्य |
| (ङ) तंत्रशिक्षण विभागाचा एक अधिकारी. | .... | सदस्य -सचिव. |

(४) पोट-कलम (३) च्या खंड (क), (ख), (ग) व (घ) अन्वये, अपील प्राधिकरणाच्या अध्यक्षाची व सदस्यांची नियुक्ती राज्य शासनाद्वारे, निवड समितीच्या शिफारशीवरून करण्यात येईल.

(५) तंत्रशिक्षण विभागातील उपसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा अधिकाऱ्याची अपील प्राधिकरणाचा सदस्य-सचिव म्हणून प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात येईल.

(६) कोणत्याही खाजगी अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्थेशी संबंधित असणारी कोणतीही व्यक्ती अपील प्राधिकरणाचा अध्यक्ष, सदस्य किंवा तज्ज्ञ होण्यास पात्र असणार नाही.

(७) अपील प्राधिकरणाच्या अध्यक्ष किंवा सदस्याने, राज्य शासनाच्या मते, अध्यक्ष किंवा सदस्य पदाला अशोभनीय वर्तन केल्यास, त्याचे अध्यक्ष किंवा सदस्यत्व संपुष्टात येईल.

(८) अध्यक्ष, अपील प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्ष पद भूषवील आणि त्यांना योग्य वाटेल अशा विनियमांद्वारे त्यांची स्वतःची अशी कार्यपद्धती स्वीकारतील.

(९) अपील प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्यात कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणामुळे अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही.

(१०) कलम ८ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अपील प्राधिकरणाच्या अध्यक्षाचा व सदस्यांच्या पदावधीच्या आणि सेवाशर्तीच्या बाबतीत लागू होतील.

(११) शासन, अपील प्राधिकरणाचे कामकाज सुरळीतपणे चालवण्यासाठी कर्मचारीवर्गाची तरतूद करील.

(१२) अपील प्राधिकरणाचा सर्व खर्च, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या निधीतून भागवण्यात येईल.

**१५.ख.** (१) अपील प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील,— अपील प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.

(क) हितसंबंधित घटकांच्या अपिलावर निर्णय घेणे आणि त्यास अंतिम मंजुरी देणे.

(ख) प्रवेश नियामक प्राधिकरण व शुल्क नियामक प्राधिकरणाच्या आदेशावरील आणि निर्णयांवरील, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, अपिलावर निर्णय घेण्यासाठी त्याची कार्यपद्धती विहित करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये त्याची कार्ये पार पाडताना, आणि या अधिनियमान्वये अपिलावर निर्णय घेण्याच्या प्रयोजनार्थ, अपील प्राधिकरणास, पुढील बाबींसंबंधात दाव्याची न्यायचौकशी करताना, १९०८ चा ५. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतीलः -

(एक) कोणत्याही साक्षीदाराला समन्स पाठवून उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे;

(दोन) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेणे आणि तो सादर करणे;

(तीन) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे;

(चार) साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे.

(३) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या किंवा शुल्क नियामक प्राधिकरणाच्या आदेशांमुळे आणि निर्णयामुळे व्यथित झालेल्या हितसंबंधित घटकास, प्रवेश नियामक प्राधिकरणाचा किंवा शुल्क नियामक प्राधिकरणाचा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, अपील प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल. अपील प्राधिकरण असे अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत असे अपील निकालात काढील आणि त्यावरील अपील प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.".

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ ऐवजी, पुढील प्रकरण दाखल करण्यात येईल :— सन २०१५चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १६ ऐवजी दाखल करणे.

### " प्रकरण चार-ख

### नियामक प्राधिकरणाचा व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचा निधी

**१६.** (१) प्रत्येक नियामक प्राधिकरण व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष यासाठी स्वतंत्र निधी असेल.

(२) उक्त प्राधिकरणांच्या व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या निधीमध्ये पुढील रकमांचा समावेश असेल,—

(एक) खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेद्वारे देय प्रक्रिया शुल्क;

(दोन) ठेवीवरील व्याज;

(तीन) राज्य शासन, केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर संस्थांकडून अनुदान (कोणतेही असल्यास) ;

(चार) शुल्क, स्वामित्वहक्क, शास्ती व आकारणी केलेला, वसूल केलेला सेवा आकार, इत्यादींसह नियामक प्राधिकरणास व सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास (सी.ई.टी.) स्वीकारता येतील, असे इतर कोणतेही पैसे.

(३) (एक) नियामक प्राधिकरणांना आणि सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास (सी.ई.टी.), सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी), इत्यादी आयोजित करण्यासाठी प्रक्रिया शुल्क व शुल्क आणि प्रक्रिया निश्चित करण्यासाठीचे आकार उक्त प्राधिकरणे व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, वेळोवेळी ठरवील त्यानुसार आकारता येतील.

(दोन) संबंधित प्राधिकरणांद्वारे व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाद्वारे वेतन, भत्ते, प्रशासकीय खर्च, मानधन, पायाभूत सुविधांच्या गरजा आणि त्यांच्या कार्यांच्या अनुषंगाने इतर कोणतेही कार्य यांसह त्यांच्या दैनंदिन खर्चाचा विचार करून प्रत्येक वर्षासाठीचे प्रक्रिया शुल्क ठरविण्यात येईल.

(४) संबंधित प्राधिकरणे आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतंत्र बँक खाते उघडतील आणि जमा झालेल्या रकमांमधून त्यांचा खर्च भागवतील.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १७ ऐवजी दाखल करणे.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

लेखे ठेवणे.

“**१७.** (१) नियामक प्राधिकरणे आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, लेख्यांच्या वाणिज्यिक प्रणालीच्या आधारे आपापले लेखे ठेवतील.

(२) नियामक प्राधिकरणांचे आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे लेखे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे ठेवण्यात येतील.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ ला त्याचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात येईल, आणि,—

(१) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) मध्ये “नियामक प्राधिकरणांच्या” या मजकुरानंतर, “व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(२) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

“(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींना बाधा न आणता, नियामक प्राधिकरणांच्या आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षांच्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा, संबंधित प्राधिकरणांनी व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाने नियुक्त केलेल्या भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या सदस्याद्वारे करण्यात येईल.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम १९ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मध्ये,—

(१) समास टिपेमधील, "नियामक प्राधिकरणांच्या" या मजकुरानंतर, "व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(२) "नियामक प्राधिकरणे" या मजकुरानंतर, "व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये,- सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ यांच्या कलम २० ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मधील, खंड (क) व (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतीलः—

"(क) पहिल्या उल्लंघनाबद्दल, तीन लाख रुपयांपेक्षा कमी नसेल किंवा या अधिनियमाअन्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट असेल, यापैकी जे अधिक असेल ते;

(ख) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या उल्लंघनाबद्दल, पंधरा लाख रुपयांपेक्षा कमी नसेल किंवा या अधिनियमाअन्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या तिप्पट असेल, यापैकी जे अधिक असेल ते";

(२) पोट-कलम (३) मधील, "दखलपात्र असेल" या मजकुरानंतर, "आणि न्यायालयाच्या परवानगीने, आपसात मिटवण्याजोगा असेल" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(३) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३क) कोणतेही न्यायालय, प्राधिकरणाने किंवा प्राधिकरणाने या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या लेखी तक्रारीशिवाय, या अधिनियामान्वये शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही.".

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम २० नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन २०१५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये नवीन कलम २०क समाविष्ट करणे.

"**२०क.** (१) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे, शुल्क नियामक प्राधिकरणाचे व अपील प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांची सुयोग्य नावांची राज्य शासनाकडे शिफारस करण्यासाठी आणि या अधिनियमान्वये त्यांना सोपविलेली कार्ये पार पाडण्यासाठी निवड समिती असेल. निवड समिती.

(२) निवड समिती ही, पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल,-

(क) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन .... अध्यक्ष

(ख) अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव,

सामान्य प्रशासन विभाग ..... सदस्य

(ग) अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव,

उच्च व तंत्रशिक्षण विभाग ..... सदस्य

(घ) अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव,

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग ..... सदस्य

(ङ) प्रधान सचिव व विधि परामर्शी,

विधि व न्याय विभाग ..... सदस्य.

(३) निवड समितीद्वारे अनुसरावयाची कार्यपद्धती.—(एक) राज्य शासन, प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीसाठी किंवा प्राधिकरणात अध्यक्ष किंवा सदस्याच्या पदावर कोणतीही रिक्त जागा निर्माण झाल्यास अथवा निर्माण होण्याची शक्यता असल्यास निवड समितीकडे निर्देशित करील.

निवड समिती, प्राधिकरणाच्या अध्यक्षाच्या किंवा सदस्याच्या निवडीच्या प्रयोजनासाठी, तिला योग्य वाटेल अशा कार्यपद्धतीचा अवलंब करील.

(दोन) निवड समिती, राज्य शासनाने निर्दिष्ट केलेले रिक्त पद किंवा रिक्त पदे भरण्यासाठी स्वतंत्रपणे तीन पेक्षा अधिक नसेल इतक्या व्यक्तींची रचना केलेल्या नामिकेच्या विचारार्थ राज्य शासनाला शिफारस करील.

(तीन) निवड समिती, खंड (एक) अन्वये निर्देशित केलेल्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीच्याआत राज्य शासनाला त्यांच्या शिफारशी सादर करील.

(चार) निवडसमितीच्या अध्यक्षाशी विचारविनिमय करून, दिनांक व ठिकाण निश्चित केल्यानंतर, निवड समितीच्या बैठकीसाठीची नोटीस किंवा यथास्थिति, कार्यसूची, आमंत्रकाद्वारे काढण्यात येईल.

(पाच) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा सचिव हा निवड समितीचा आमंत्रक असेल.

(सहा) राज्य शासन, प्राधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीसाठी किंवा रिक्त जागा भरण्यासाठी निवड समितीच्या शिफारशी विचारात घेईल.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २१ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मधील, "प्राधिकरणांच्या कार्यालयात" या मजकुरानंतर "व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षात" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये नवीन कलमे २१क ते २१ङ समाविष्ट करणे.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

पदसिद्ध सदस्यांची उपस्थिती.

"**२१क.** नियामक प्राधिकरणाचा पदसिद्ध सदस्य, जो त्याच्या कार्यालयीन कामामुळे प्राधिकरणाच्या बैठकीला उपस्थित राहण्यास असमर्थ आहे, तो त्याच्या लगतच्या दुय्यम अधिकाऱ्याला अशा बैठकीस उपस्थित राहण्यास प्राधिकृत करू शकेल आणि अशा प्राधिकृततेची संबंधित सदस्य-सचिवाला आधीच माहिती देईल.

प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती.

**२१ख.** शासनाकडून नियुक्त केलेल्या आणि नियामक प्राधिकरणांकडे किंवा यथास्थिति, सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाकडे प्रतिनियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असतीलः

परंतु, नियामक प्राधिकरण, आदेशाद्वारे, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना योग्य वाटतील त्याप्रमाणे, अतिरिक्त लाभ देऊ शकेल.

अध्यक्ष, सदस्य व अधिकारी, इत्यादी, लोकसेवक असणे.

**२१ग.** प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य, नियामक प्राधिकरणे व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे अधिकारी व कर्मचारी, जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदींच्या अनुसार कार्य करीत असतील किंवा कार्य करणे अभिप्रेत असेल, तेव्हा त्यांना भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २ मधील खंड (२८) च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. २०२३ चा ४५.

प्रवेश नियामक प्राधिकरण आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष यांच्यातील विवाद किंवा मतभेद.

**२१घ.** प्रवेश नियामक प्राधिकरण किंवा सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष यांच्यामध्ये, एखादी विशिष्ट बाब नेमकी कोणाच्या अखत्यारीत येते यावरून कोणताही विवाद किंवा मतभेद असल्यास, ती बाब सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रभारी सचिवाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल, ज्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**२१ङ.** नियामक प्राधिकरणांमध्ये, एखादी विशिष्ट बाब प्रवेश नियामक प्राधिकरण किंवा शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याशी संबंधित आहे यावरून कोणताही मतभेद असल्यास, ती बाब, एकतर प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या किंवा शुल्क नियामक प्राधिकरणाच्या सदस्य-सचिवाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रभारी सचिवाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल, त्यावरील ज्याचा निर्णय अंतिम असेल.". नियामक प्राधिकरणांमधील मतभेद.

**२३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये, "प्राधिकरणांना" या मजकुराऐवजी, "नियामक प्राधिकरणांना, अपील प्राधिकरण व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाला" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**२४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये नवीन कलम २२क समाविष्ट करणे.

"**२२क.** नियामक प्राधिकरणे, अपील प्राधिकरण व सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष यांना या अधिनियमाअन्वये त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आणि कार्ये करण्यासाठी, त्यांना आवश्यक असेल त्याप्रमाणे, सर्व व्यावसायिक शैक्षणिक संस्था मदत व सहाय्य करतील.". व्यावसायिक शैक्षणिक संस्थांची कर्तव्ये आणि त्यांच्याकडून सहाय्य.

**२५.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अध्यादेशाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

२०२६ चा महा. अध्या. २.

**२६.** (१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.]**

**[महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**[विधानसभेने दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव -३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.